# मत्स्य उपकेंद्र, तारापोरवाला सागरी जीवशास्त्रीय संशोधन केंद्र

## साईनगर, पनवेल – ४१०२०६

---

जा. क्र. तासाजीसके / प्रक्षेत्र सहाय्यक / जाहिरात / 644 / 2025 दिनांक: 06 JAN 2025

प्रति,

मा. संचालक विस्तार शिक्षण,
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ,
ता. दापोली, जि. रत्नागिरी.

विषय: विद्यापीठ संकेत स्थळावर जाहिरात प्रसिद्ध करणेबाबत....
संदर्भ : विद्यापीठ पत्र क्रं डॉ बासाकोकृवि /संशो 3 /२७ /२०२५ , दि ०३/०१/२०२५

आदरणीय महोदय,

उपरोक्त संदर्भाधिन विषयांन्वये मत्स्य उपकेंद्र, तारापोरवाला सागरी जीवशास्त्रीय संशोधन केंद्र,साईनगर, पनवेल येथे "प्रक्षेत्र सहाय्यक" (कंत्राटी) या पदाची तात्पुरती नेमणूक अकरा महिने कालावधीकरीता करावयाची आहे. त्यानुषंगाने "प्रक्षेत्र सहाय्यक" (कंत्राटी या पदासाठी अर्ज मागविणेसंबंधी जाहिरात सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

तरी कृपया सदरील जाहिरात विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावी, हि विनंती.

आपला विश्वासू
6/1/25
संशोधन अधिकारी
मत्स्य उपकेंद्र, तासाजीसंके, पनवेल

प्रत:

१. मा. संशोधन संचालक, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी याना माहितीसाठी सविनय सादर.
२. प्रभारी अधिकारी, कृषी ज्ञान व्यवस्थापन कक्ष, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी याना कार्यवाहिसाठी सविनय सादर.

# मत्स्य उपकेंद्र
## तारापोरवाला सागरी जीवशास्त्रीय संशोधन केंद्र
(डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली)

साई नगर , पनवेल-४१०२०६,

संपर्क – ९८३४४०८६७५ , ई मेल - tmbrs@dbskkv.ac.in

जा क्र तासाजीसंके /मत्स्य उपकेंद्र/आस्था/प्रक्षेत्र सहाय्यक/645/2025, दि 06 JAN 2025

# जाहिरात

**( कंत्राटी पद्ध्तीने प्रक्षेत्र सहाय्यक नियुक्ति करणे)**

मत्स्य उपकेंद्र, तारापोरवाला सागरी जीवशास्त्रीय संशोधन केंद्र, साईनगर, पनवेल येथे "प्रक्षेत्र सहाय्यक" (कंत्राटी) या पदाची तात्पुरती नेमणूक करणेकरीता सिलबंद अर्ज मागविण्यात येत आहेत. "प्रक्षेत्र सहाय्यक" या पदासाठी अर्हता धारक उमेदवारांची निवड करावयाची आहे. तरी पात्र उमेदवारानी त्यांची शैक्षणिक अर्हता, कामाचा अनुभव इत्यादि बाबी नमुद करुन त्यांचे अर्ज 'मा. संशोधन अधिकारी तथा केंद्र प्रमुख, मत्स्य उपकेंद्र, ता सा जी सं के, साईनगर, पनवेल' यांच्या नाव दि. 22.01.2025 रोजी, 05.00 वाजेपर्यंत 'मा. केंद्र प्रमुख, मत्स्य उपकेंद्र, ता सा जी सं के, साईनगर, पनवेल' या कार्यालयाकडे विहित कालावधीत पोहोचतील असे सादर करावे.

| अ. क्र. | पदाचे नाव | पदाची संख्या | एकत्रित वेतन प्रति महिना (रु.) | नेमणूकीचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | प्रक्षेत्र सहाय्यक (कंत्राटी) | ०१ | १६,०००/- | 11 महीने |

| अ.क्र. | पदाचे नाव | पद संख्या | अर्हता |
|---|---|---|---|
| १. | प्रक्षेत्र सहाय्यक (कंत्राटी) | ०१ | कृषि /उद्यानविद्या / वनशास्त्र / पशुविज्ञान / कृषि तंत्रज्ञान / कृषि अभियांत्रिकी / गृह विज्ञान / **मत्स्य विज्ञान /** जैव तंत्रज्ञान या विषयातून पदवी परिक्षा उतीर्ण किंवा कृषि विद्यापीठामधील पदविका किंवा तिच्याशी समंतुल्य म्हणून मान्यता मिळालेली अशी इतर कोणतीही अर्हता तसेच (CCC-O-A-B-C level, MSCIT/GECT), (या विद्यापीठाकडे सेवेत तात्पुरत्या / रोजनदारी स्वरूपात काम करत असलेल्या साठी १० वर्षे किंवा त्याहून जास्त अनुभवास प्राधान्य) |

वरील तात्पुरती नेमणूक खालील अटी व शर्तीना अधिन राहून करावयाची आहे.

१) वयोमर्यादा - खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरीता ३८ व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांकरीता ४३ वर्षे राहिल.

२) उमेदवारानी विहित प्रपत्रामध्ये पुर्ण भरून अर्ज 'मा. संशोधन अधिकारी तथा केंद्र प्रमुख, मत्स्य उपकेंद्र, ता सा जी सं के, साईनगर, पनवेल' यांचे नावे सादर करावा.

३) लखोट्यावर "कंत्राटी प्रक्षेत्र सहाय्यक" या पदासाठी अर्ज लिहिलेले असावे.

४) पात्र उमेदवाराची निवड समितीद्वारे मुलाखत घेण्यात येईल.

५) मुलाखतीच्यावेळी अर्जासोबत जोडण्यात आलेली सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक.

६) मुलाखतीसाठी बोलविण्यात आलेल्या उमेदवाराना कोणताहि प्रवासभत्ता तसेच दैनंदिन भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

७) निवड झालेल्या उमेदवाराला नेमणुकिच्या आदेशातील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा करारनामा विहित नमुन्यात रु. १०० किमतीच्या बॉन्ड पेपरवर लिहून द्यावा लागेल.

८) उमेदवाराला सदर योजनेतील नेमणूक पुढे चालू ठेवण्यासाठी तसेच डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोलीच्या नियमित आस्थापनेवर नियुक्तीसाठी दावा करता येणार नाही.

९) उमेदवारला नोकरी सोडून जाण्याची इच्छा असल्यास एक महिन्याची आगाऊ सुचना द्यावी लागेल अन्यथा एक महिनयाचे वेतन भरणा करावे लागेल.

१०) निम्नस्वाक्षरीकार याना प्राप्त अर्ज / सर्व अर्ज कोणतेही कारण न दाखविता नाकरण्याचा अधिकार राहिल.

११) कार्यालयाच्या कामकाजाची वेळ ९.४५ ते १८.१५ अशी राहिल. तथापी, एखाद्या दिवसाचे काम वाढल्यास काम पुर्ण होईपर्यंत थांबावे लागेल किंवा काम पुर्ण करण्यासाठी लवकर यावे लागेल.

१२) सुट्टीच्या दिवशी कामाच्या निकडीनुसार उपस्थित रहावे लागेल. जादा केलेल्या कामाचा कोणताही मेहनताना देण्यात येणार नाही.

१२) काम समाधानकारक न वाटल्यास त्याच्या सेवा कोणत्याहि दिवशी समाप्त करण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरीकाराना राहतील.

१३) सदर नियुक्ति अकरा महिने कालवधीकरीता राहिल. निम्नस्वाक्षरीकाराना विशेष परिस्थितीत कोणत्याहि वेळी सदर नियुक्ति / नेमणूक समाप्त करण्याचे अधिकार राहतील. सदर प्रक्षेत्र सहाय्यक नेमणूक प्रक्षेत्रावरील कामाची निकड, मनुष्य बळाची आवश्यकता बघून गरजेनुसार करण्यात येईल.

१४) सर्वोच्च न्यायालयाने निर्धारीत केलेल्या याचिका क्र. एस. एल. पी. - ५४५३ / ९० निर्णयाच्या अनुषंगाने नियुक्ति कालावधीनंतर विद्यापीठ सेवेत कायम स्वरूपी नोकरी मिळण्याबाबत हक्क राहणार नाही.

१५) कोणत्याहि प्रकारचे गैरवर्तन केल्यास उमेदवाराची नेमणूक रद्द होऊ शकते.

१६) कोणत्याही टपाल विलंबासाठी हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

१७) कोणत्याही स्वरूपात राजकारणात सहभाग आढणून आल्यास उमेदवारला या पदासाठी अपात्र ठरविले जाईल.

१८) वयाचा लाभ / फायदा घेण्यासाठी उमेदवाराने नॉनक्रिमिलेयर / जातीचा दाखला सादर करणे आवश्यक राहिल.

१९) नावामध्ये बदल असल्यास गॅझेट (राजपत्र) जोडण्यात यावे.

२०) प्रमाणपत्रे सत्यप्रतीत / स्वयंसाक्षांकित असल्यास स्वयंघोषणापत्रासह जोडणे आवश्यक आहे.

२१) अर्जावर उमेदवाराने पासपोर्ट आकराचा फोटो चिकटवावा.

आपला विश्वासू

6/1/25

**संशोधन अधिकारी,**

मत्स्य उपकेंद्र तासाजीसंके, पनवेल

# अर्जाचा नमूना

अर्जदारांचा फोटो

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अर्जदाराचे नाव | : | |
| २. | ई - मेल | : | |
| ३. | पदाचे नाव | : | |
| ४. | पत्रव्यवहारासाठी पत्ता | : | |
| ५. | जन्म तारीख | : | |
| ६. | दिनांक २६/०७/२०२४ रोजी वय | : | |
| ७. | धर्म / जात | : | |
| ८. | दूरध्वनी / भ्रमण ध्वनी क्रमांक | : | |
| ९. | शैक्षणिक अर्हता | : | |

| परीक्षा | बोर्ड / महाविद्यालयाचे / शाळेचे नाव | उत्तीर्ण वर्ष | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१० . अनुभव (काही असल्यास) :

| पदाचे नाव | कालावधी | | कामाचे स्वरूप | कामाचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| | पासून | पर्यंत | | |
| | | | | |
| | | | | |

११. इतर

मी असे लिहून देतो / देते की, वर दिलेली सर्व माहिती बरोबर असून टी सत्य आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास पदासाठी मी पात्र नसेन यांची मला जाणीव आहे.

दिनांक :-

ठिकाण :- उमेदवारांची सही

टीप : अर्जायासोबत जोडण्यात येणाऱ्या सर्व प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती सत्यप्रात केलेल्या असाव्यात. जर प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती स्वयं साक्षाकित केल्या असतील तर शासन निर्णय क्र. प्रसुधा / १६१४ / ३४५ / प्र. क्र. ७१ / १८ – अ, दिनांक ०९.०३.२० अन्वये विहित नामुन्यातील स्वयं – साक्षाकनाचे स्वयं घोषणापत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.